दाखल दिनांकः १६.०१.२०२५
नोंदणी दिनांकः १६.०१.२०२५
पारीत दिनांकः ०४.०६. २०२६
कालावधीः ०१ वर्षे,०४ महिने,१९दिवस

MHYA100000482025

<u>न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्रमांक २ केळापुर, यांच्या न्यायालयात</u>

**{पिठासीन अधिकारी श्रीमती. सायमा एन.ए.एस. शेख }**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक १६/२०२५** **नि.क्र. १३**

**महाराष्ट्र सरकार,**
निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क,
पांढरकवडा, ता. केळापुर जि.यवतमाळ

.....**अभियोग पक्ष**

**...विरुध्द...**

**प्रल्हाद विश्वनाथ दडांजे ,**
वय ३८ वर्षे, व्यवसायः मजुरी
रा. बोथ ता. केळापुर जि. यवतमाळ

..... **आरोपी**

**<u>महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ च्या कलम ६५ (ई) अंतर्गत खटला</u>**

.............................................................................................

सरकारतर्फे– श्री. एस.बी.जगताप, सहायक सरकारी अभियोक्ता
आरोपीतर्फे– श्री. ए.के. पाटील, वकील साहेब

.............................................................................................

## न्यायनिर्णय

(पारीत दिनांक ०४.०६.२०२६ )

प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये ठेवण्यात आलेल्या आरोपाकरीता चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन–**

२. दिनांक ०२/१०/२०२४ रोजी फिर्यादी एन.के.कुळसंगे सहकारीसोबत ता. केळापुर परिसरात पेट्रोलिंग करत असतांना त्यांना गुप्त माहीती मिळाली की, बोथ येथे आरोपी नामे प्रल्हाद विश्वनाथ दडांजे त्याचे राहते घरी एका कापडी पिशवीमध्ये देशी विक्री करीत आहे. अशा माहीतीवरुन त्यांनी पंचासमक्ष घटनास्थळी छापा टाकला असता आरोपीच्या ताब्यातुन देशी दारुचे १८० मिली क्षमतेचे ३२ सिलबंद बॉटल विनापरवाना मिळून आली. त्यावरुन सदरचा माल पंचासमक्ष जप्त करुन त्यापैकी प्रत्येकी एक १८० मि.ली. क्षमतेची बाटली सि.ए. तपासणी करीता नमुना वेगळा काढून जप्तीपंचनामा करण्यात आला. त्यावरुन फिर्यादी यांनी त्याच दिवशी आरोपीविरुध्द फिर्याद नोंदविली.

३. सदर फिर्यादवरुन तपासी अमलदारांनी निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क पांढरकवडा , जि. यवतमाळ येथे आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) न्वये गुन्हा क्रमांक २२३/२०२४ नुसार गुन्हा नोंद केला. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी घटनास्थळ पंचनामा, जप्ती पत्रक तयार केले व आरोपीस अटक करुन अटक पंचनामा तयार केला व आरोपीस सुचनपत्रावर सोडले. तपासाअंती आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये गन्हयाचे प्रतिकथन निशानी क्र.१० अन्वये निश्चीत करुन वाचून दाखविण्यात आले. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे प्रतिकथन केले व त्यांचेवर फौजदारी संपरीक्षा चालविण्याची विनंती केली. अभियोगपक्षातर्फे केवळ एका साक्षीदाराचा पुरावा नोंदविण्यात

आला. अभियोगपक्षाच्या पुराव्यातून आरोपीविरुध्द कुठलीही बाब न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

५. अभियोगपक्षाचा पुरावा बघता, प्रकरणाच्या न्यायनिर्णयाकरीता माझ्या समक्ष खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थीत झाले असून त्यांचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेतः–

| अ.क्र. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | सरकारपक्षाने असे सिध्द केले काय की, दिनांक ०२/१०/२०२४ रोजी १२:०० वाजताच्या दरम्यान मौजा बोथ येथे आरोपीने त्याच्या राहत्या घरी एका कापडी पिशवीमध्ये १८० मिली क्षमतेचे ३२ सिलबंद बॉटल विनापरवाना बाळगतांना व विक्री करीत असतांना आढळून आला. त्यामुळे आरोपीने महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम च्या कलम ६५ (ई) अंतर्गत शिक्षापात्र अपराध केला का? | नकारार्थी |
| २. | काय आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली |

## कारणमिमांसा

६. आरोपीविरुध्द आरोप साबित करण्याकरीता सरकारी पक्षातर्फे पुरावा सादर करण्यात आला. मौखिक पुराव्यामध्ये पंच साक्षीदार क्र. १ महेश विजय धाबेकर यांना सरकारी पक्षाने तपासले.

७. सहायक सरकारी अभियोक्ता श्री. एस.बी. जगताप व आरोपीतर्फे वकील श्री.ए.के. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. साक्षपुरावा व अभिलेखाचे अवलोकन केले.

**<u>मुद्दा क्रमांक १ व २ करीताः</u>**–

८. आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्याकरीता सरकार पक्षाने साक्षीदार क्र.१ महेश विजय धाबेकर याला जप्ती पंचनाम्यातील पंच म्हणून तपासण्यात आले. सदर पंचसाक्षीदाराने, दिनांक ०२.१०.२०२४ रोजी राज्य उत्पादन शुल्क पोलीसांनी त्यांना पंचनाम्याकरीता बोलाविले नव्हते, पोलीसांनी त्याचे समक्ष काहीही जप्त केले नाही असे कथन केले. सदर पंचाने जप्ती पंचनाम्यातील मजकूर माहीती नसल्याबाबत सांगीतले. सरकारी वकीलांनी घेतलेल्या उलटतपासात त्यांनी अभियोग पक्षाच्या कथनास कोणत्याही प्रकारे समर्थन केले नाही.

९. सदरच्या प्रकरणात सरकारी पक्षाने रासायनिक परिक्षणाचा अहवाल अभिलेखावर आज पर्यंत दाखल केलेला नाही. तसेच एका पंच साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहकार्य न केल्याने आरोपीच्या ताब्यातून नमुद मुद्देमाल जप्ती झाल्याचे सिध्द झाले नाही. त्याच्या परिणामी स्वरूप अभियोग पक्ष हा जप्ती पंचनामा सिध्द करण्यात असफल झाला. करीता घटनेच्या वेळी आरोपी एका कापडी पिशवीमध्ये १८० मिली क्षमतेचे ३२ सिलबंद बॉटल विनापरवाना बाळगतांना व विक्री करीत असतांना मिळून आला. असे सरकारपक्ष सिध्द करु शकले नाही.

१०. एकंदरीत अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आरोपीकडील जप्त मुददेमालासंबंधी केलेला जप्ती पंचनामा सरकारी पक्ष साबित करू शकला नाही. त्यामुळे सदर जप्ती पंचनाम्यावर संशय निर्माण होतो आणि घटनेच्या वेळी आरोपीच्या ताब्यातून वर नमुद मुददेमाल मिळून आला या बाबीवरच संशय निर्माण होतो.

११. सरकारी पक्षाने तपासलेल्या एका पंचानी सरकारी पक्षास सहकार्य केले नाही. सरकारी पक्ष जप्ती पंचनामा सिध्द करण्यास विफल झालेला आहे. सरकारी पक्षाने प्रथम खबरी अहवाल सुध्द सिध्द केला नाही. सर्व परिस्थीतीचे एकंदरीत विवेचन केले असता असे दिसून येते की अभियोग पक्ष हा आरोपीविरुध्द गुन्हा संशयाच्या पलीकडे जावुन सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. त्यामुळ आरोपी ही प्रस्तुत खटल्यातून निर्दोष मुक्त होण्यास प्राप्त असल्याचे निष्कर्षाप्रती मी येवून पोहोचली आहे.

करीता मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदवून, मुद्दा क्रमांक २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहेः–

# आदेश

१ आरोपी **प्रल्हाद विश्वनाथ दडांजे** यांना महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ च्या कलम ६५ (ई) अंतर्गतच्या गुन्हयातून कलम २५५(१) फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२ आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३ आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम ४३७ अ च्या पुर्ततेकरीला आरोपीकडुण वैयक्तील बंधंदपत्र स्विकारुण पुर्तता करण्यात आली.

४ जप्त मुददेमाल अपील कालावधी नंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग, यवतमाळ यांचेकडे पुढील विल्हेवाटीकरीता पाठविण्यात यावे.

५ न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित.

स्वा/–

(सायमा एन.ए.एस .शेख )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
(न्यायालय क्रं.२), केळापुर.

केळापुर
दिनांक ०४.०६.२०२६